पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail**: prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १९/०८/२०२०

## शासकीय रकमेच्या अपहार प्रकरणातील आरोपीतांकडुन तपासादरम्यान१ कि.१६०ग्रॅ.सोने जप्त

- ❖ मोठागुन्हा उघड करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश
- ❖ जिल्हा परिषद भंडारा येथील ६ करोड रुपयाचा शासकीय रकमेचा अपहार झाल्याचे तपासादरम्यान उघड
- ❖ पुन्हा ०२ आरोपीं जेरबंद

जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत जलसंधारण विभागातील शासकीय रकमेचा अपहार प्रकरण संबंधाने, बनावट स्वाक्षऱ्या व कार्यालयीन शिक्के मारुन आरटीजीएस संबंधात पत्र तसेच बनावट धनादेशाद्वारे एकुण ६,२२,५९,३५१/- रुपये रकमेपैकी एकुण २,८६,१३,८५१/- रुपये विड्राल करुन आर.टि.जी.एस. (R.T.G.S.) चे माध्यमाने १) रामदुत कन्स्ट्रक्शन कंपनी खाते क्र. ६०३२५६१६२७५ २) निर्वाना बिल्डर्स खाते क्र. २२४११११०००३०२२, ३) चिरंजीवी ट्रेडलींक खाते क्र.५०४८७३३३२२७, ४) उत्कर्ष निर्माण कंपनी खाते क्र. ०००१०१७८०००२२१५, ५) पवनसुत कन्स्ट्रक्शन कंपनी खाते क्र. ६०३३०९३८०८९ इत्यादी बॅंक खात्यांमध्ये वळती करुन दिनांक ०३/०६/२०१९ ते दिनांक १२/०६/२०१९ दरम्यानचे कालावधीत केला असल्याबाबत लेखी फिर्यादवरुन पोलीस स्टेशन गडचिरोली (महाराष्ट्र) येथे दिनांक- १९/०९/२०१९ रोजी अप. क्र. ४५८/२०१९ कलम ४२०,४६५,४६८,४७१,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयाचा तपास **मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली करीत आहे.**

मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे यांच्या नेतृत्वात मा. अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) डॉ. मोहीतकुमार गर्ग यांनी स्थानिकगुन्हे शाखा गडचिरोली येथील अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेवुन गुन्हयाचे तपासा संदर्भात मार्गदर्शन केले मा. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हयातील आरोपीतांच्या अटक प्रक्रियेसंबधाने ६ वेगवेगळे स्वतंत्र पोलीस पथक तयार करुन यातील सक्रीय आरोपीं १) स्नेहदिप श्रीराम सोनी वय ४७ वर्षे रा. नंदनवन केडीके कॉलेज नागपुर २) किशोरीलाल हिरालाल डहरवाल वय ५१ वर्षे,रा. रेड्डी ता.कुरई जि.शिवनी (म.प्र.) ३) सुदीप श्रीराम सोनी वय ५१ वर्षे रा.नाईक रोड, महाल नागपुर, ४) अमित मनोहर अग्नीहोत्री वय ३५ वर्षे, रा. धनगवळी नगर हुडकेश्वर नागपुर ५)अतुल देवीदास डुकरे वय ४२ वर्षे, रा.प्लाट क्रमांक ६६ आशिर्वाद नगर नागपुर ६) विनोद मंगलसिंग प्रधान, वय ४७ वर्षे रा. करडी ता.मोहाडी जि. भंडारा यांना दिनांक

०५/०८/२०२० रोजी ताब्यात घेवुन मा. न्यायालयात हजर करण्यात आले असता, मा. न्यायालयाने गुन्हयाची व्यापकता व गांभीर्य लक्षात घेवुन आरोपीतांचा १४ दिवसांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला होता. तपासादरम्यान आरोपीतांनी दिलेल्या कबुलीवरुन त्यांनी अपहारीत रकमेतुन वेगवेगळया ठिकाणी खरेदी केलेल्या स्थावर मालमत्ता संबंधातील दस्तऐवज तसेच तांत्रिक पुरावे हस्तगत करुन त्यांची पडताळणी स्थानिक गुन्हे शाखे मार्फत सुरु आहे.

आरोपीतांनी खरेदी केलेल्या मालमत्ता या अपहारीत रकमेतुन खरेदी केलेल्या आहेत तसेच गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी १) स्नेहदिप ऊर्फ बंटी श्रीराम सोनी वय ४७वर्षे रा. नंदनवन केडीके कॉलेज नागपुर याने जिल्हा परिषद भंडारा व गडचिरोली येथील अपहारीत रकमेतुन मोठया प्रमाणात सोने खरेदी केले असल्याची कबुली दिल्याने त्याचे राहते घरुन तसेच बॅकेचे लॉकर मधुन १ किलो १६० ग्रॅम वजनाचे सोने जप्त करण्यात आले. सद्याचे बाजारभावाप्रमाणे जप्त सोन्याची किंमत ६०,०००००/- रुपये एवढी आहे.

तर सदर गुन्हयातील तपासादरम्यान दिनांक- १८/०८/२०२० रोजी अटक करण्यात आलेले आरोपी १) नामे सुधाकर गोपीचंद कांबळे वय ३८ वर्ष, रा. रामकृष्णनगर दिघोरी नागपुर २) संजय ज्ञानेश्वर दळवी वय ४८ वर्ष, रा. जलालपुरा शारदा चौक गांधीबाग नागपुर यांना मा. न्यायालयाने ७ दिवसांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे. सदर गुन्हयातील आरोपीतांनी जिल्हा परिषद भंडारा येथील जवळपास ६ करोड रुपयाचा शासकीय मालमत्तेचा अपहार केला असल्याची कबुली दिली आहे. नमुद गुन्हयात सक्रीय असलेल्या आरोपींची नावे निष्पन्न करण्यात आली असुन, त्यांचा गुन्हयातील सहभाग व भुमीका स्पष्ट करुन त्यांना अटक करण्याची तजवीज ठेवली आहे.

**मा.पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सा**ो. यांनी संपुर्ण तपास पथकाचे कौतुक व अभिनंदन करीत मा. अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. मोहीतकुमार गर्ग साो. यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारू तथा स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पोनि उल्हास भुसारी व त्यांच्या संपुर्ण टिमने गुन्हा दाखल झाल्यापासुन तो उघडकीस आणण्याकरीता घेतलेली मेहनत, तांत्रीक पुरावा जमा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळेच गडचिरोली पोलीस दलाला आरोपी गजाआड करण्यात यश प्राप्त झाले असल्याचे सांगितले.

.